सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्र. ०७१२—६४६५१४५/४६ फॅक्स क्र. ०७१२—२५६१६६३
E-mail : ronagpur.dte@gmail.com Website : www.rdtenagpur.org.in

अतिमहत्वाचे
कालमर्यादित

क्र:—तंशिस/प्राकाना/शैवि/वृक्ष.लागवड/२०१२/941
दिनांक :— 31 MAR 2012

प्रति,
प्राचार्य/संचालक
.....
.....
.....
(सर्व पदवी व पदविका अभियांत्रिकी/औषधनिर्माण/हॉटेल मॅनेजमेन्ट कॅटरींग टेक्नो तसेच एमबीए/एमसीए संस्था, नागपूर जिल्हा)

विषय:— **१०० कोटी वृक्ष लागवडीचे उदिष्ट साध्य करण्याबाबत**
संदर्भ:— १.मा.जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र. मगाराग्रारोहयो/कलि./कावि.२१/२०१२,दि. २७/३/१२
२. या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिस/प्राकाना/शैबी/संकिर्ण/२०१२/७५७, दि.१४/३/१२

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये या कार्यालयाच्या पत्रान्वये आपणास आपल्या संस्थेस एकुण १००० वृक्ष लावण्याबाबत आपणास कळविण्यात आले होते. परंतू संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये **मा. जिल्हाधिकारी कार्यालयाव्दारे तंत्रशिक्षण विभागाचे उद्दिष्ट कमी केल्यामुळे आपणास आता फक्त २०० वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आले आहे.**

सदर उपक्रम यशस्वीरित्या पुर्ण करण्यासाठी मा. मुख्यमंत्री व मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी विशेष लक्ष घालून सदर उपक्रम यशस्वी करण्याबाबत आदेशित केले असल्याने सदर उपक्रम गांभिर्याने घेणे आवश्यक आहे. करीता आपण खालीलप्रमाणे सुचनांचे पालन करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

१. वृक्ष लागवड जुन—२०१२ च्या पहिल्या आठवडयात करावयाची असल्यामुळे वृक्ष लागवड करण्याकरीता **खोदावयाचे खड्डे ३० एप्रिल, २०१२ पुर्वी खोदावे** जेणेकरुन खोदलेल्या मातीवर सुर्यप्रकाशामुळे प्रक्रीया होवून योग्य वेळी लागवड केलेली रोपे जोमाने वाढतील व मरअळ होणार नाही.
२. कोणत्याही परिस्थीतीत **वृक्ष लागवड १५ ऑगस्ट, २०१२ पुर्वी करावी,** जेणेकरुन लागवड केल्यानंतर पडलेल्या पावसाचा रोपास योग्य वाढीकरीता फायदा होईल.
३. लागवड करण्यात येणा—या रोपांची उंची ३५ सें.मी. पेक्षा कमी नसावी.

आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमार्फत वरीलप्रमाणे मुद्दा क्रमांक १ अन्वये खोदलेल्या खडयांचा अहवाल दिनांक ३० एप्रिल, २०१२ पुर्वी या कार्यालयास सादर करावा. सदर उपक्रम हा जनहितार्थ व पर्यवरणाशी संबंधीत असल्यामुळे उपक्रम यशस्वी करण्याकरीता आपण विशेष लक्ष घालून उपक्रम यशस्वी करण्याकरीता प्रयत्न करावे.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर

प्रत:— प्रोग्रामर हेच कार्यालल यांना सदर पत्र वेबसाईलवर अपलोड करण्याकरीता